04 NOV 2022

लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षणाचा मार्ग सुकर

## शिवाजी विद्यापीठाकडून मोफत प्रवेश : विविध सवलतीही देणार

**संतोष मिठारी**

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर** : महाराष्ट्र-कर्नाटक सीमाभागातील विद्यार्थी उच्चशिक्षणाच्या प्रवाहात यावेत या उद्देशाने शिवाजी विद्यापीठाने मोफत प्रवेशासह विविध सवलतींच्या माध्यमातून यावर्षी पाऊल टाकले. त्यामुळे सीमाभागातील ६८५ गावांतील १७९ विद्यार्थ्यांच्या उच्चशिक्षण घेण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

राज्य शासनाच्या निर्देशानुसार शिवाजी विद्यापीठाने या सीमाभागातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला बळ देण्याची कार्यवाही केली. त्यात विद्यापीठ कॅम्पसमधील अभ्यासक्रमांसाठी मोफत आणि सवलतीमध्ये प्रवेश योजना लागू केली. त्याच्या पहिल्या वर्षी यंदा एम.एस्सी. मॅथेमॅटिक्स, इलेक्ट्रॉनिक्स, रसायनशास्त्र, फूड सायन्स, मराठी, हिंदी, इतिहास, समाजशास्त्र, एलएलएम, एम.ए. मास कम्युनिकेशन, भूगोल, बीसीए., एम. टेक, एमआरएस., एमएसडब्ल्यू अशा २५ अभ्यासक्रमांसाठी ५४ विद्यार्थी प्रवेशित झाले आहेत. शिनोळी येथे विद्यापीठाने सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र केंद्राद्वारे कौशल्यावर आधारित अभ्यासक्रम सुरू केले आहेत. त्याठिकाणी काजू प्रक्रिया, कॉम्प्युटर ॲप्लिकेशन आदी अभ्यासक्रमांचे १२५ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यामध्ये शेतकरी, सर्वसामान्य कुटुंबातील अधिकतर विद्यार्थी-विद्यार्थिनी आहेत. शिक्षणाच्या माध्यमातून सक्षम होण्यासाठी शासनाने विशेष शिष्यवृत्ती योजना लागू केल्यास त्यांना आणखी बळ मिळणार आहे.

### विद्यापीठ देते या सुविधा

विद्यापीठातील अधिविभागातील अनुदानित अभ्यासक्रमांचे शैक्षणिक, वसतिगृहाचे शुल्क घेतले जात नाही. विनाअनुदानित अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक शुल्कात २५ टक्के सवलत दिली जाते. भाग एकच्या नियमित अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी १० टक्के जागा राखीव आहेत. पीएच.डीसाठी प्रवेश मिळाल्यानंतर तीन वर्ष वसतिगृहाची मोफत सुविधा दिली जाते. गुणवत्ता शिष्यवृत्ती दिली जाते. राज्य शासनाच्या सीईटीअंतर्गत प्रवेश निश्चित करणाऱ्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ या विविध सुविधांचा लाभ देते, असे विद्यापीठाच्या संलग्नता विभागाचे उपकुलसचिव डॉ. विलास सोयम यांनी गुरुवारी सांगितले.



मास कम्युनिकेशनला मी प्रवेशित झाल्यानंतर संबंधित योजनेचे परिपत्रक जारी झाले. विद्यापीठाने माझा शुल्कातील सवलतीसाठी विचार करावा. आमच्या महाविद्यालयीन शिक्षणाची प्रमाणपत्रे कर्नाटकातील असून, ती महाराष्ट्र शासनाने ग्राह्य धरावीत.

**- शर्वरी मधाळे, ममदापूर.**

विद्यापीठाच्या मोफत प्रवेश योजनेमुळे सीमाभागातील आम्हा विद्यार्थ्यांना शिक्षणाची चांगली संधी उपलब्ध झाली आहे. मला इंडस्ट्रियल केमिस्ट्री अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला असून, विद्यापीठाचे आभार मानते. सीमाभागातील विद्यार्थ्यांसाठी शासनाने विशेष शिष्यवृत्ती दिल्यास अधिक चांगले होईल - **स्नेहा जाधव**, कोगनोळी.

04 NOV 2022
तरूण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# आधुनिक तंत्रज्ञान मानवाची ज्ञानेंद्रियेच

## फरीदाबादचे मानव रचना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड स्टडीजचे प्रा.चक्रवर्ती यांचे मत

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

आधुनिक तंत्रज्ञान कोणतीही वस्तू खराब न करता त्यामधील असलेल्या कमतरतेचा शोध लावतात. क्ष किरणे, अल्ट्रासाउंड, चुंबकीय क्षेत्र, विद्युत प्रवाह, अशा प्रकारची आधुनिक यंत्रे वस्तूंमधील दोष शोधण्यासाठी उपयोगी पडतात. त्यामुळे आधुनिक तंत्रज्ञान मानवाची ज्ञानेंद्रियेच आहेत, असे मत प्रा. एस. के. चक्रवर्ती यांनी व्यक्त केले.

शिवाजी विद्यापीठात स्तुति अंतर्गत प्रशिक्षण कार्यक्रमाच्या तिसऱ्या दिवशी ते बोलत होते. सहभागी व्यक्तींनी विद्यापीठातील विभागांना भेटी देऊन विश्लेषण तंत्राची माहिती घेतली. विद्यापीठाच्यावतीने प्रा. चक्रवर्ती यांचा सत्कार करण्यात आला.

प्रा. चक्रवर्ती म्हणाले, औद्योगिक क्षेत्रात बॉयलर अथवा मोठ्या टाकीला पडलेल्या भेगा शोधण्यासाठी क्ष किरणांचा वापर केला



**कोल्हापूर : फरीदाबादचे मानव रचना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड स्टडीजचे प्रा. एस. के. चक्रवर्ती यांचे स्वागत करताना स्तुतिचे समन्वयक प्रा. आर. जी. सोनकवडे.**

जातो. नुकत्याच झालेल्या गुजरातमधील पूल कोसळण्याच्या घटनेमुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागला. परंतु अशा प्रकारच्या वस्तूंची पाहणी करण्याकरता, त्यातील दोष शोधण्याकरता नवीन विकसित तंत्रे वापरता येतात. प्रत्येक क्षेत्रात तंत्रज्ञानाला महत्त्व असून अनेक औद्योगिक क्षेत्रे देखील अशा तंत्रांचा वापर करताना दिसतात. डॉ. आर. जी. सोनकवडे यांनी 'एक्स–रे डिफ्रॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप' या उपकरणाविषयी माहिती दिली. शास्त्रीय आणि औद्योगिक क्षेत्रात याचा वापर होतो. सैफ डीएसटी केंद्रातील अत्याधुनिक उपकरणांची सुविधा वापरण्यासाठी आयएसटीएम या पोर्टलद्वारे कशाप्रकारे नोंदणी करावी याविषयी माहिती दिली. सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील टेस्ट करून दिले.

विविध उपकरणे सहभागींना प्रत्यक्षपणे हाताळायला मिळाली. वैज्ञानिक आणि प्रशासकीय अनुभवाचा वापर करून स्तुति अंतर्गत खूप चांगले कार्यक्रम आयोजित केले आहेत. सोनकवडे यांनी भारत सरकारच्या विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालयाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे आभार मानले.

पुढारी

# ‘आधुनिक विकसित तंत्रे मानवाची ज्ञानेंद्रिये’

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

वस्तूंना इजा न पोहोचवता त्यामधील दोष ओळखण्यासाठीची विकसित तंत्रे मानवाची ज्ञानेंद्रिये आहेत, असे प्रतिपादन मानव रचना इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ रिसर्च अँड स्टडीज (फरीदाबाद)चे प्रा. एस. के. चक्रवर्ती यांनी केले.

शिवाजी विद्यापीठात ‘स्तुती’ उपक्रमांतर्गत सुरू असलेल्या आठवडी प्रशिक्षण कार्यक्रमात तिसऱ्या दिवशीच्या सत्रात ते बोलत होते. प्रा. चक्रवर्ती यांनी कोणत्याही प्रकारचे नमुने खराब न करता त्याचे विश्लेषण करण्याच्या तंत्रांची माहिती दिली.

दुसऱ्या सत्रात प्रा. आर. जी. सोनकवडे यांनी ‘एक्स-रे डिफ्रॅक्शन स्पेक्ट्रोस्कोप’ या उपकरणाविषयी मार्गदर्शन केले.

यानंतर सहभागी शिक्षक प्राध्यापक व संशोधक विद्यार्थी यांना सैफ, डीएसटी, सीएफसी येथील उपकरणांचे गटानुसार प्रात्यक्षिक दिले गेले. सहभागींपैकी काहींनी आणलेले सॅम्पल देखील येथे टेस्ट करून दिले.

पुढारी

# डॉ. ग. गो. जाधव अध्यासन इमारत उभारणीस साडेचार कोटींचा निधी

## पालकमंत्री दीपक केसरकर यांची माहिती

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

दै. 'पुढारी'चे संस्थापक संपादक पद्मश्री डॉ. ग. गो. जाधव यांची शिवाजी विद्यापीठात होत असलेल्या अध्यासनाच्या इमारत उभारणीस एकाचवेळी साडेचार कोटी रुपयांचा निधी दिला असल्याची माहिती पालकमंत्री दीपक केसरकर यांनी दिली.

कोल्हापूर दौऱ्यावर असताना त्यांनी माध्यमांशी विविध विषयांवर संवाद साधला. यावेळी मंत्री केसरकर म्हणाले, डॉ. ग. गो. जाधव यांचे पत्रकारिता क्षेत्रासह महाराष्ट्राच्या सामाजिक चळवळीतील योगदान मोठे आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक लढ्यातील अग्रणी प्रबोधनकार ठाकरे यांच्यासह थोर व्यक्तींशी त्यांची तुलना होऊ शकते. शिवाजी विद्यापीठात डॉ. ग. गो. जाधव यांच्या नावाने देशातील पत्रकारितेचे पहिले अध्यासन होत आहे. सध्या इमारत उभारणीचे काम सुरू आहे.


यावर्षी अध्यासनाची इमारत पूर्ण करण्यात येणार असून याद्दष्टीने साडेचार कोटी रुपयांना निधी तात्काळ उपलब्ध करुन दिला आहे. डॉ. ग.गो. जाधव यांचे कार्य लक्षात घेता कोल्हापूरकरांच्या जिव्हाळा व आत्मियतेचा विषय असणाऱ्या अध्यासनाचा प्रकल्प लवकरच पूर्ण होण्याच्या दृष्टीने जिल्हा प्रशासनास सूचना दिल्या आहेत. डॉ. ग. गो. जाधव पत्रकारिता अध्यासनाच्या माध्यमातून चालणारे सर्व अभ्यासक्रम, उपक्रम पत्रकारितेला नवी दिशा देणारे ठरतील, असेही मंत्री केसरकर यांनी सांगितले.

महासत्ता

# विद्यार्थी विकास विभागाच्या संचालकपदी डॉ.गायकवाड

कोल्हापूर, ता.२(प्रतिनिधी)-

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाच्या प्रभारी संचालकपदी डॉ. प्रकाश तुकाराम तथा पी.टी. गायकवाड यांची नियुक्ती करण्यात आली आहे.



प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते डॉ. गायकवाड यांना नियुक्तीपत्र देण्यात आले. त्यावेळी त्यांच्या विद्यार्थीभिमुखतेचा आणि अनुभवाचा लाभ विद्यार्थी विकास विभागाला होईल, अशी अपेक्षा प्र-कुलगुरू डॉ.पाटील यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्रभारी कुलसचिव डॉ.विलास शिंदे यांनीही त्यांचे अभिनंदन केले.

तरूण भारत

# विविध अधिकार मंडळाच्या पात्र उमेदवारांची यादी जाहीर

- विद्यापीठाकडून रात्री उशिरापर्यंत उमेदवारांची यादी जाहीर करण्याचे काम सुरू होते

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत अर्जांची छाननी, अपीलावरील सुनावणी आणि अर्ज माघारीनंतर पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर गुरुवारी रात्री उशिरा प्रसिध्द झाली. यातील काही अभ्यास मंडळ, शिक्षक, पदवीधरमधील काही जागा बिनविरोध झाल्या आहेत तर १४ नोव्हेंबर रोजी अधिसभा पदवीधर, शिक्षक आणि काही अभ्यास मंडळांसाठी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीचा निकाल १६ नोव्हेंबर रोजी जाहीर होईल आहे. पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्याचे काम गुरुवारी रात्री उशिरापर्यंत सुरू होते.

विद्यापीठ निवडणूक प्रक्रियेतील महत्वाचा भाग म्हणजे पात्र उमेदवारांची यादी प्रसिध्द करणे. अपीलावर सुनावणी आणि निवडणूक यादी प्रसिध्द या दोन्ही प्रक्रिया बुधवारी एकाच दिवशी असल्याने यादी प्रसिध्द करण्यास उशिर झाला. परिणामी निवडणुकीला उभे असलेल्या उमेदवारांमध्ये आणि विकास आघाडी, सुटा, शिव-शाहू आघाडीच्या नेत्यांमध्ये अस्वस्थता होती.

### विद्यापीठ प्रशासनाची दिरंगाई चुकीची

सुनावणीचा निकाल ईमेलव्दारे अथवा संकेतस्थळावर कळवतो, असे विद्यापीठ प्रशासनाने सांगितले. परंतु रात्री उशिरापर्यंत उमेदवारांना कोणत्याही प्रकारची माहिती मिळाली नसल्याने त्यांच्यात अस्वस्थता होती. या विद्यापीठाच्या दिरंगाईबद्दल सुटामध्ये नाराजी आहे.

– डॉ. डी. एन. पाटील ( मुख्य कार्यवाह, सुटा)

पुढारी

# विद्यापीठ निवडणूक; पात्र उमेदवारांची यादी प्रसिद्ध

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ निवडणुकीत अर्जांची छाननी, अपिलावरील सुनावणी व अर्ज माघारीनंतर पात्र उमेदवारांची यादी विद्यापीठाच्या संकेतस्थळावर गुरूवारी रात्री उशिरा प्रसिद्ध झाली. यातील काही अभ्यास मंडळ, शिक्षक, पदवीधरमधील काही जागा बिनविरोध झाल्या आहेत. दरम्यान, गुरुवारी रात्री उशिरापर्यंत पात्र उमेदवारांची यादी जाहीर करण्याचे काम सुरू होते. अपिलावर सुनावणी व निवडणूक यादी प्रसिद्ध करणे या दोन्ही प्रक्रिया एकाच दिवशी असल्याने यादी प्रसिद्ध करण्यास उशीर झाला आहे. त्यामुळे विकास आघाडी, सुटा, शिव-शाहू आघाडीच्या नेत्यांमध्ये स्वस्थता पहायला मिळाली.

लोकमत

# मयुरी सावळकर हिची बुद्धिबळसाठी निवड

कोल्हापूर : येथील कमला कॉलेजची



विद्यार्थिनी मयुरी मुकुंद सावळकर (बीसीए भाग-२) हिने जयसिंगपूर येथील कोल्हापूर विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत चौथा क्रमांक मिळविला. तिची इस्लामपूर येथे होणाऱ्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय बुद्धिबळ स्पर्धेसाठी निवड झाली आहे. तिला ताराराणी विद्यापीठाचे कार्यकारी अध्यक्ष डॉ. क्रांतीकुमार पाटील, सचिव प्राजक्त पाटील, प्राचार्य डॉ. तेजस्विनी मुडेकर, शारीरिक शिक्षण संचालक ज्योती गावडे यांचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

04 NOV 2022 महासत्ता

# कन्या महाविद्यालयात बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात

मिरज,ता.२(प्रतिनिधी)–
.........................

कन्या महाविद्यालय आयोजीत शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर्गत सांगली विभागीय बुद्धिबळ स्पर्धा उत्साहात पार पडली. या स्पर्धेत वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली संघाने पुरूष गटात विजेतेपद पटकावले तर चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगलीच्या संघाने महिला गटात विजेतेपद पटकावले.

या स्पर्धेत पद्मभूषण वसंतदादा पाटील इन्स्टिटच्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, बुधगाव यांचे कडून दिला जाणारा पुरूष गटातील विजेतेपदाचा कायम फिरता चषक वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली संघाने पटकाविला तर महिला गटातील विजेतेपदाचा कायम फिरता चषक चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगलीच्या संघाने पटकाविला.

त्याचबरोबर कन्या महाविद्यालय, मिरज कडून प्राचार्य डॉ. उल्हास माळकर यांचे सौजन्याने सर्वसाधारण विजेतेपदाची ट्रॉफी वालचंद कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग, सांगली या संघाने पटकाविली. तर सर्वसाधारण उपविजेतपदाची ट्रॉफी चिंतामणराव व्यापार महाविद्यालय, सांगली या संघाने पटकाविला.

या स्पर्धेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. उल्हास माळकर यांचे मार्गदर्शन मिळाले. स्पर्धेचे संयोजन शारीरिक शिक्षण संचालक प्रा. बाबासाहेब सरगर यांनी केले. पंच म्हणून रोहित पोळ व सदानंद चोथे यांनी काम पाहिले. या स्पर्धा पार पाडण्यासाठी महाविद्यालयातील शारीरिक शिक्षण व क्रीडा विभागाचे सदस्य डॉ. जे. पी. चंदनशिवे, प्रा. वी. वाय. वनमोरे,प्रा.विश्वनाथ व्होनमोरे, प्रा.रमेश कट्टीमनी यांचे सहकार्य मिळाले.यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
04 NOV 2022
पुढारी
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शिष्यवृत्तीसाठी उद्यापर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन

कोल्हापूर : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ साठी महाडीबीटी पोर्टलवर शिष्यवृत्तीचे अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याची प्रक्रिया सुरू आहे. अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गांतील विद्यार्थ्यांनी ५ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन समाजकल्याण विभागाचे साहाय्यक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले आहे. महाविद्यालयांनी विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदणीचे प्रमाण वाढण्याकरिता प्रयत्न करावेत. नोंदणी केलेले परिपूर्ण अर्ज साहाय्यक आयुक्त कार्यालयास पाठवावेत. महाविद्यालय स्तरावर प्रलंबित असलेले २०१९-२० ते २०२१-२२ कालावधीतील विद्यार्थ्यांनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.